केवळ खाजगी वितरणकरीता

ECHOES INDIA

श्री राम चंद्र मिशन ®

मे २०१४ खंड ७ अंक ३

# पूज्य बाबूजी महाराजांचा ११५ वा जन्मोत्सव – दि. २९ व ३० एप्रिल आणि १ मे २०१४






## डीजे पार्क, तिरुप्पूर

सोहळ्याची जय्यत तयारी काही आठवडे आधीच सुरु झाली होती. समारंभाच्या एक आठवडा आधीपासूनच अभ्यासींचा ओघ या ठिकाणी सुरु झाला होता आणि येथील वातावरण बदलून एका प्रकारे आनंदाचे व आशादायी झाल्याचे जाणवत होते.

### ध्यानकक्षामध्ये

ध्यानकक्ष कलात्मकतेने सजविण्यात आला होता. बाबूजींच्या भव्य छायाचित्राने व्यासपीठ व्यापून टाकले होते. ध्यानकक्षात लावलेल्या मोठ्या एल. सी. डी. पडद्यांमुळे तेथे बसलेल्या सर्वांना सर्व घडामोडी जवळून पाहता येत होत्या. शरीरातील पाणी कमी होऊ नये म्हणून अभ्यासींना भरपूर पाणी पिण्यास सांगण्यात आले होते. त्यामुळे स्वयंसेवक सर्वांना पिण्याचे पाणी देत होते.

पूज्य गुरुदेवांना त्यांच्या प्रकृतीच्या कारणास्तव चेन्नईला रहावे लागल्यामुळे तीन दिवसीय महोत्सवातील आठ सत्संगांचे सचालन बंधू कमलेश पटेल यांनी केले. हे सत्संग भंडाऱ्यास जमलेल्या जवळपास १५००० अभ्यासींसाठी उत्साहवर्धक व अनुभवांची व्याप्ती सखोल करणारे होते. दि. २९ एप्रिल रोजी सत्संगानंतर मार्च २०१४ मध्ये प्राप्त झालेल्या काही विशेष व्हिस्पर्स संदेशांचे वाचन करण्यात आले. या संदेशांतून बंधू कमलेश पटेल यांना गुरुदेवांचे उत्तराधिकारी म्हणून संपूर्ण मान्यता व पुष्टी देण्यात आली.




दि.२९ रोजी सकाळी, मुलांनी अनेक नव्या प्रकाशनांचे विमोचन केले. यानंतर बंधू कमलेश पटेल यांनी 'कम्प्लीट वर्क्स ऑफ रामचंद्र –भाग ४' याबद्दल आणि ज्या लोकांनी हा भाग संकलित करण्यास हातभार लावला त्यांच्याविषयी संगितले. या भागात बाबूजींनी अभ्यासींना लिहीलेल्या काही पत्रांचा समावेश आहे. काही लेख जे यापूर्वी केवळ हिंदीमध्ये प्रकाशित करण्यात आले होते त्यांचाही यात









"या मार्गावर बिनचूकपणे, विचलित न होता, या संदेशांवर (व्हिस्पर्स) निष्ठा ठेऊन, आत्मविश्वासपूर्वक, संपूर्ण मानवजातीप्रति प्रेमाची भावना ठेऊन मार्गक्रमण करण्यासाठी तसेच सर्व चैतन्याप्रति प्रेम निर्माण होण्यासाठी पूज्य बाबूजींचे आशीर्वाद आम्हा सर्वांना लाभोत"

पी. राजगोपालाचारी

अंतर्भाव करण्यात आला आहे.

रखरखीत उन्हाळा असूनही संपूर्ण कार्यक्रम संपेपर्यंत अभ्यासी ध्यानकक्षामध्ये शांतपणे बसलेले होते.

बंधू कमलेश यांनी दि. ३० एप्रिल रोजी सकाळी ६ वाजताच्या सत्संगानंतर सहा विवाह संपन्न केले. थोड्या अवधीनंतर चेन्नई येथून व्हिडियो लिंकद्वारे पू. गुरूदेवांचे पडद्यांवर आगमन झाले. यामुळे उपस्थितांना गुरूदेवांच्या नातीने–भगिनी माधुरी कृष्णा हिने वाचलेला व्हिस्पर्स मधील संदेश आणि पू. गुरूदेवांनी दिलेले भाषण प्रत्यक्ष ऐकण्याची संधी मिळाली. ही व्हिडियो लिंक मिशनच्या जगभरातील सर्व केंद्रांसाठी उपलब्ध करण्यात आली होती.

दि. ३० रोजी संध्याकाळी जेव्हा दिवसभराची प्रखर उष्णता हळूवारपणे गारव्याला वाट करुन देत होती त्यावेळेस; भगिनी रंजना यांच्या भजनांमुळे सर्वांना गुरुदेवांच्या स्मरणात राहता आले.

**इतर उपक्रम**

विभाग प्रमुख, केंद्र प्रमुख, आश्रम व्य–वस्थापक तसेच इतर काही संघातील स्वयंसेवक यांच्या बैठका घेण्यात आल्या. यामध्ये त्यांनी त्यांच्या नियोजित कामांबद्दल चर्चा केली.








लहान मुले आणि युवा केंद्राने तीन वयोगटात मुलांची विभागणी केली होती. यावेळी मुलांना विविध उपक्रमांमध्ये गुंतवून ठेवण्यात आले होते. बालक केंद्राला ८००० पेक्षा जास्त चमकदार अशा ओरीगामीच्या 'शांती क्रेन्स'चा वापर करुन सुशोभित करण्यात आले होते. ध्यानगृहातील व्यासपीठावर आपापल्या भाषांमधील नविन साहित्य प्रकाशित करण्याच्या प्रक्रियेत बंधू कमलेश यांना मदत करण्यासाठी लकी ड्रॉ द्वारे मुलांची निवड करण्यात आली. सुमारे २५०० मुलांची या भंडाऱ्यात नोंदणी झाली होती.

दूरवर चालावे लागू नये म्हणून नेहमीच्या मोठ्या उपाहारगृहाबरोबरच आणखी तीन उपाहारगृहांची सोय करण्यात आली होती. भंडारा सुरळीतपणे पार पडावा यासाठी भोजनकक्ष, राहण्यासाठी तंबू, इतिहासकक्ष, छायाचित्र दालन, टी–शर्ट विक्रीकेंद्र इ. पायाभूत सुविधाही निर्माण करण्यात आल्या होत्या. गुरूदेवांच्या कुटीराबाहेर निर्माण करण्यात आलेल्या 'मौन विभागामुळे' (सायलेन्स झोन) गुरुदेवांच्या आरामासाठी सुयोग्य वातावरण निर्माण झाले होते.











**भाषणे**

भंडाऱ्यामध्ये जमलेल्या समुदायाला बंधू कमलेश यांनी तीन वेळा संबोधित केले. त्यांनी नियमित साधनेवर भर दिला व बाबूजी महाराजांची शिकवणूक पुन्हा प्रतिपादित केली. दि. १ मे रोजी दिलेल्या आपल्या समारोपाच्या भाषणात ते म्हणाले की आपल्या उत्क्रांतीच्या वेगाला नेहमीच नियंत्रित करणारा एक घटक म्हणजे आपल्या इच्छा. ते पुढे म्हणाले की ध्यान व सतत स्मरणाच्या साधनेद्वारे आपण अशी स्थिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला पाहिजे की त्या अवस्थेमध्ये आपल्या इच्छा आपल्यावर परिणाम करू शकणार नाहीत. हा भव्य उत्सव यशस्वी करण्यात ज्या समन्वयक व स्वयंसेवकांनी मोलाचे योगदान दिले त्यांचे आभार मानताना ते म्हणाले, "ज्या आत्म्यांनी अनाम राहून सेवा केली, त्यांनी खात्री बाळगावी की त्यांचे प्रारब्ध 'त्यांच्या' कोमल हृदयाशी दृढपणे निगडित झाले आहे."

## मणपक्कममध्ये:

मणपक्कम येथे ३५००हून अधिक अभ्यासी उपस्थित होते. उत्सवपूर्ण वातावरणामध्ये रंगीबेरंगी रांगोळ्या व फुलांनी ध्यानगृहाचे प्रवेशद्वार सजविण्यात आले होते. दि. २९, ३० एप्रिल व १ मे या तीनही दिवशी ध्यानगृहात सकाळचा सत्संग गुरुदेवांनी स्वतः संचालित केला. दिवसभर गुरुदेव विविध देशांतून आलेल्या अभ्यासींना भेटत होते.

दि. ३० रोजी सकाळी ६.०० वाजताच गुरुदेवांनी कुटिरामध्ये प्रसाद अर्पण केला. ते अत्यंत प्रफुल्लित व जोशपूर्ण दिसत होते. सत्संगानंतर तिरुप्पूर येथे चाललेल्या भंडाऱ्यातील ध्यानकक्षाशी व्हिडियो लिंकद्वारे संपर्क प्रस्थापित करण्यात आला. माधुरी कृष्णा हिने दि.३० एप्रिलचा व्हिस्पर्स संदेश वाचून दाखविला. त्यानंतर गुरुदेवांनी स्वतः उपस्थितांना संबोधित केले. अलिकडेच आलेल्या व्हिस्पर्स संदेशांचा उल्लेख करत त्यांनी पुनः एकदा सांगितले की ते संदेश मिशनच्या भविष्यातील सातत्याबद्दल खात्रीपूर्वक दिलासा देत आहेत. तथापि, आपण आपले लक्ष केवळ वर्तमानकाळावरच केंद्रीत केले पाहिजे आणि भविष्यातील गोष्टी भविष्यकाळावर सोडून दिल्या पाहिजेत. ते म्हणाले, "मी पुनरुक्ती करतो की ज्या काळात आपण जन्म घेतला आहे, निसर्गाने ज्या काळात आम्हाला जन्मास घातले आहे, त्या काळाचा आपण लाभ घेतला पाहिजे. आज ज्या स्थितीत हे मिशन उभे आहे, त्या मिशनचा अभ्यासी होण्याची अपूर्व संधी निसर्गाने आपणां सर्वांस दिली आहे; हे मिशन जे काही लाभ आज आम्हास देऊ करत आहे ते स्वीकारत, द्वेष, टीका यांचा त्याग करून, कोणत्याही पूर्वग्रहाविना सर्वांप्रति प्रेम बाळगत, आपण निर्धाराने व निग्रहाने आपल्या ध्येयाकडे वाटचाल करीत राहिले पाहिजे. या सर्व गोष्टी नुसत्या बोलणे खूप सोपे आहे पण त्या आचरणात आणणे अत्यंत कठीण आहे."

गुरुदेवांनी त्यानंतर भगिनी मंदानाच्या सहाय्याने केक कापला व तो बाबूजी महाराजांना अर्पण केला.

> "जर आपली उत्क्रांती होत असेल तर (हृदयाकडे निर्देश करत) येथेही आपली उत्क्रांती झाली पाहिजे. उत्क्रांतीचा प्रारंभ येथून होतो व तिची अखेरही येथेच होते. आणि हे सर्व कसे सुरु होते? आपल्या हृदयांत हलकेपणा वाढीस लागल्याने, द्वेष–मत्सराशिवाय, पूर्वग्रहाशिवाय अधिकाधिक लोकांना आपलेपणाने जवळ केल्याने (याची सुरुवात होते).
>
> पी. राजगोपालाचारी





# मणपक्कम येथील बातम्या

## फेब्रुवारी २०१४

**गायत्री येथे गुरुदेव :** दि. ५ ते १४ फेब्रुवारी

दि. ५ फेब्रुवारी रोजी तिरूवल्लुर येथे वैद्यकीय केंद्राचे बांधकाम सुरू करण्याची योजना होती. पण गुरुदेव स्वतः प्रवास करण्याच्या स्थितीमध्ये नसल्यामुळे त्यांनी ही जबाबदारी बंधू कमलेश आणि बंधू पी. आर. कृष्णा यांच्यावर सोपवली. सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास गुरुदेव मॉलमध्ये गेले आणि तेथे काही खाद्यपदार्थ खरेदी करून त्यांनी ‘गायत्री’ मध्ये आपल्या कुटुंबाला अनपेक्षित अशी भेट दिली. खरेतर आश्रमामध्ये परतण्याचे त्यांनी ठरवले होते, पण नंतर त्यांनी आपला बेत बदलला आणि ते ‘गायत्री’ येथेच राहिले.

**कानपूर आश्रमाच्या बांधकामाचे उद्घाटन:**

रविवार दि. ९ फेब्रुवारी

गुरुदेव सकाळी लवकरच तयार झाले पण अद्यापही त्यांची प्रकृती फारशी ठीक नव्हती. असे असतानाही त्यांनी व्ही.डी.ओ. लिंकद्वारे कानपूर येथील सर्व अभ्यासींना अभिवादन केले आणि अभ्यासींनी त्यांना उत्साहाने आणि प्रेमपूर्वक प्रतिसाद दिला. क्षणार्धातच गुरुदेवांना उत्साह वाटू लागला आणि तिथे जमलेल्या समूहाला त्यांनी संबोधित केले. त्यांनंतर पायाभरणीच्या कामासंदर्भात विटांची रचना इ. विषयी सूचना दिल्या. गुरुदेवांनी अभ्यासींसोबत संवाद साधत या प्रकल्पाच्या तपशीलाविषयी सखोल माहिती मिळवली आणि नंतर ते म्हणाले “मी येथून सत्संग संचालित करत आहे आणि तुम्ही सर्वांनी ध्यान सुरु करावे.” त्यानंतर गुरुदेव ‘गायत्री’ मधील दिवाणखान्यात आले आणि जमलेल्या सर्व अभ्यासींसाठी त्यांनी सत्संग संचालित केला. हा सत्संग एक तासभर चालला. यानंतर गुरुदेव अत्यंत थकले होते आणि विश्रांती घेण्यासाठी ते आत गेले. या दरम्यान आश्रमामध्ये बंधू कमलेश पटेल यांनी काही विवाह संपन्न केले.

**युरोपियन प्रशिक्षकांचा परिसंवाद**: दि. १५ ते २० फेब्रुवारी

दि. १५ फेब्रुवारी रोजी परिसंवादाच्या उदघाटनासाठी गुरुदेवांचे मणपक्कम येथे आगमन झाले. निवासकक्ष ‘अ’ मध्ये जमलेल्या प्रशिक्षकांसाठी त्यांनी सत्संग संचालित केला. त्यानंतर प्रशिक्षकांच्या कामामध्ये सुधारणा घडवून आणण्याविषयी ते बोलले. ते म्हणाले की प्रशिक्षक म्हणून आपले काम जेव्हा आपल्याला आवडते, तेव्हाच आपण सफाईदारपणे काम करु शकतो आणि ते अधिक परिणामकारकही होते. याविषयी गुरुदेवांनी अनेक उदाहरणे दिली. गुरुदेव ‘गायत्री’ येथे परतणार होते, म्हणून त्यांनी युरोपियन अभ्यासींच्या चमूला, रोज संध्याकाळी छोट्या गटांमध्ये येऊन भेटण्याचे आमंत्रण दिले.

**आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रम (आय.एस.टी.पी.)**

दि. १५ रोजी गुरुदेवांनी आंतरराष्ट्रीय शिष्यवृत्ती प्रशिक्षण कार्यक्रमामधील सर्व सहभागींना आणि समन्वयकांना दुपारच्या जेवणासाठी आमंत्रण दिले. शिष्यवृत्तीधारकांना प्रमाणपत्राचे वाटप केल्यानंतर, प्रत्येकजण जेवणासाठी पानावर बसल्याची खात्री करुन झाल्यावर, गुरुदेवांनी त्यांच्यासोबत कुटीराबाहेरील आवारामध्ये भोजनाचा आस्वाद घेतला. त्यानंतर त्यांनी गायत्रीकडे प्रस्थान केले.

**रविवार दि. १६ फेब्रुवारी**

‘गायत्री’ येथे उपस्थित असलेल्या सुमारे साठ अभ्यासींसाठी गुरुदेवांनी सत्संग संचालित केला. त्यानंतर ते अतिशय थकले होते आणि काही वैद्यकीय उपचारांसाठी ते आतमध्ये गेले.

संध्याकाळी ‘प्रशिक्षक परिसंवादासाठी’ आलेल्या अभ्यासींपैकी सुमारे साठ अभ्यासी गायत्री येथे आले होते. गुरुदेव त्यांच्यासोबत दिवाणखान्यात बसले आणि तेथे सर्वांना अल्पोपाहार देण्यात आला. प्रथम हे एक शांत असे सत्र होते, पण नंतर एका भगिनीने व्हायोलिन हे वाद्य वाजवले. जेव्हा ती या वाद्यांच्या कंपनाविषयी बोलली तेव्हा गुरुदेव म्हणाले की “सर्वकाही कंपन हेच आहे.” जेव्हा तिचा एक खंड वाजवून झाला, तेव्हा गुरुदेवांनी तिला वादन सुरु ठेवण्यास





continued..



सांगितले. यानंतर काही अभ्यासी त्यांच्याजवळ आले आणि त्यांनी गुरुदेवांना पत्रे, भेटवस्तु इत्यादि दिल्या.

गुरुदेवांना त्यांच्या युरोपच्या यात्रेची आठवण आली व ते भाषांबद्दल आणि काही भाषा, विशेषत: स्कॅनडिनेव्हियन– शिकण्यास कशा क्लिष्ट आहेत याविषयी थोडा वेळ बोलले. हा त्या आठवड्याचा नित्यक्रम झाला होता: सकाळी अभ्यासी गुरुदेवांना भेटण्यासाठी येत असत तर संध्याकाळी पन्नास ते साठच्या गटामध्ये युरोपियन प्रशिक्षक त्यांना भेट देत असत.

**रविवार दि. २३ फेब्रुवारी**

गुरुदेवांची प्रकृती फारशी बरी नसल्यामुळे, अभ्यासींनी ‘गायत्री’ला भेट देऊ नये असे विनंतीपूर्वक सूचित करूनही मोठ्या प्रमाणात अभ्यासी ‘गायत्री’ येथे आले. गुरुदेवांनी सुमारे एक तास दहा मिनिटे असा प्रदीर्घ काळ चाललेला सत्संग संचालित केला. त्यानंतर ते फार थकलेले होते, पण तरीही आतमध्ये जाण्याआधी ते काही लोकांना भेटले.

**दि. २४ ते २८ फेब्रुवारी**

दिवसेंदिवस गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये चढउतार होत होते. गुरुवारी रात्री त्यांचा नातू भार्गव दिल्लीहून आला आणि पुढील तीन दिवस गुरुदेवांसाठी अतिशय चैतन्यमयी गेले.

## मार्च २०१४

**गायत्रीमध्ये गुरुदेव:** दि. १ ते ९ मार्च

भार्गवचे मार्चच्या पहिल्या आठवड्याच्याशेवटी ‘गायत्री’मधील वास्तव्य गुरुदेवांसाठी एक सुखकर असा बदल होता. संपूर्ण कुटुंबाला त्याच्यासोबत वेळ व्यतीत करता आला. दि. २ रोजी भार्गवने दिल्लीकडे प्रस्थान केले.

भार्गव परत गेल्यानंतर गुरुदेवांचे वास्तव्य एका आठवड्यासाठी गायत्रीमध्येच होते. ते विश्रांती घेत होते आणि थोडे बरे वाटले की सत्संगही संचालित करत होते. यादरम्यान त्यांना भेटणाऱ्या लोकांची संख्या कमी होती आणि हे त्यांना अधिकच ताजेतवाने करणारे होते. या आठवड्याच्या शेवटी त्यांच्या तब्येतीत आश्रमात परतण्याइतपत सुधारणा झालेली होती.

**मणपक्कममध्ये परत:** सोमवार, दि. १० मार्च २०१४

एक महिन्याच्या ‘गायत्री’मधील वास्तव्यानंतर गुरुदेव मणपक्कम येथे परतले. त्यांच्या प्रकृतीमध्ये सावकाश परंतु अव्याहत सुधारणा होत होती; ते सहजतेने हिंडू–फिरू शकत होते. जेव्हा ते मणपक्कम आश्रमात आले, तेव्हा गोल्फकार्टमधून फेरी मारत असताना लोकांना भेटले आणि त्यांनी आश्रमाच्या आवारात चालू असलेल्या बांधकामाचा आढावाही घेतला. ते सक्रियपणे सीटींग्ज देत होते, अभ्यासींना भेटत होते आणि आश्रमाच्या कार्यालयीन कामातही त्यांनी सहभाग घेतला. जेव्हा ते कुटिराच्या बाहेर बसत, तेव्हा अभ्यासीचा समूह त्यांच्या सभोवती असे.

**गुरुदेवांनी संचालित केलेला सत्संग:** रविवार, दि. १६ मार्च

गुरुदेव सकाळी सहा वाजताच तयार झाले आणि म्हणाले, “आज मला छान वाटते आहे”. एका अभ्यासीने त्यांना होळीचा दिवस (रंगांचा उत्सव) असल्याचे सांगितले. हे एकून गुरुदेवांचा चेहरा खुलला, आणि ते म्हणाले की आज मी स्वत: जाऊन सत्संग संचालित करणार आहे. मग त्यांनी एक तासापेक्षा अधिक वेळ सत्संग संचालित केला आणि ते कुटिराकडे परतले.

**गीता सत्र**

बंधू संस्कृत कन्नन यांच्या गीतेमधील अंतिम (अठराव्या) अध्यायाच्या प्रवचनाचा आज शेवट होणार होता. दीड तासाच्या या सत्रामध्ये त्यांनी या अध्यायामधील विविध श्लोकांच्या अर्थाविषयी तपशीलवार विवेचन केले. भगवान कृष्णाने दिलेल्या संदेशामधून असा भाव दिसतो की ‘सर्व काही त्याग करुन मला शरण या’. गुरुदेव अतिशय तल्लीन होऊन हे सत्र पाहत होते. अध्याय संपू न शकल्याने पुढील आठवड्यापर्यंत हे सत्र लांबविण्यात आले.





**गृहप्रवेश:** बुधवार, दि, १९ मार्च २०१४

आश्रमाच्या पाठीमागच्या बाजूस असणाऱ्या द्वारका अपार्टमेन्ट येथे एका गृहप्रवेशाच्या निमित्ताने गुरुदेवांनी भेट दिली. ते सरळ वर गेले, नव्या घरामध्ये रहावयास येणाऱ्या कुटुंबाला त्यांनी हाक मारून बोलविले व प्रसाद दिला व त्यानंतर सत्संग संचालित केला. सुमारे चारशे अभ्यासी सत्संगाकरीता जमा झाले होते! आपल्या व्हीलचेअरमध्ये बसून त्यांनी घराचे निरीक्षण केले, नव्या घरात काही काळ व्यतीत केला व त्यानंतर बंधू कमलेश यांच्या खालच्या मजल्यावरील घरी त्यांनी प्रस्थान केले.

**बंधू कमलेश यांचे निवासस्थान:** दि. १९ ते २५ मार्च २०१४

गुरुदेवांनी येथे काही काळ वास्तव्य करण्याचे ठरविले. नेहमीप्रमाणे सकाळ-संध्याकाळ अभ्यासींची ये-जा चालू होती. सकाळच्या न्याहारीनंतर गुरुदेव सिटींग्स देत असत. संध्याकाळी दिवाणखान्यात येऊन, त्यांच्या भौतिकोपचारांची वेळ होईपर्यंत, ते जमलेल्या अभ्यासींची भेट घेत असत. हा नित्यक्रम रविवारपर्यंत चालू होता.

रविवारी सकाळी बंधू कमलेश सत्संग संचालित करण्यासाठी आश्रमामध्ये गेल्यानंतर गुरुदेव खाली उतरले व तेथे उपस्थित असणाऱ्यांकरीता त्यांनी सत्संग संचालित केला. या प्रदीर्घ सिटींगनंतर गुरुदेव थकलेले दिसत होते व त्यांना श्वसनाला त्रास होत होता.

**गीता सत्र:** रविवार दि. २३ मार्च २०१४

गुरुदेवांचे वास्तव्य बंधू कमलेश यांच्या निवासस्थानी असताना आश्रमातील ध्यानगृहामध्ये संचालित केली जाणारी गीतेवरील सत्रे गुरुदेवांना पाहता यावीत या हेतूने एक व्हिडियो लिंक तयार करण्यात आली होती. आधी ठरविल्याप्रमाणे हा शेवटचा कार्यक्रम होता. गुरुदेवांची प्रकृति विशेष ठीक नसतानाही ते या सत्रामध्ये पूर्णपणे रंगून गेले होते. गीतेच्या सर्व अध्यायांचा समावेश असणारे एक 'पुनरावलोकन सत्र' आयोजित करण्यात येईल व त्यानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम होईल असे शेवटी जाहीर करण्यात आले.

**गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये बिघाड:** दि. २३ ते ३१ मार्च २०१४

गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये सुधारणा होत नसल्याने काही वैद्यकीय चाचण्या घेण्यात आल्या व उपचारांची सुरूवात झाली. गुरुदेवांना कुटिरमध्ये येऊन वास्तव्य करण्याची इच्छा होती परंतु अशक्तपणामुळे त्यांना तेथे जाणे शक्य झाले नाही. काही दिवसांनंतर, थोडी शक्ती आल्यावर, दि. २५ मार्चच्या सुमारास ते कुटिरामध्ये परतले.

## एप्रिल २०१४

एप्रिलच्या पहिल्या दोन आठवड्यादरम्यान गुरुदेवांची तब्येत फारशी ठीक नव्हती. वैद्यकीय तज्ज्ञांचा एक समूह कुटिरामध्ये उपस्थित होता. त्यांना भेटण्याची परवानगी कोणालाही नव्हती. आजाराचे निदान व योग्य असे औषधोपचार सुरू झाल्यानंतर गुरुदेवांच्या प्रकृतीमध्ये सावकाश परंतु सातत्याने सुधारणा झाली. औषधांमुळे त्यांना सतत झोप आल्यासारखे वाटत होते, त्यामुळे त्यांनी विश्रांती घेतली. थोडे बरे वाटू लागल्यानंतर काही वेळाकरीता त्यांनी कुटिराच्या समोर किंवा बाबूजी मंडप येथे बाहेर येऊन बसण्यास सुरूवात केली.

बडोदा येथून आपल्या कुटुंबियांसमवेत आलेल्या तीन भगिनींची भेट घेऊन गुरुदेवांना अतिशय आनंद झाला. त्यांनी त्या मंडळींसमवेत बराच वेळ व्यतीत केला.

अनौपचारीक चर्चेदरम्यान गुरुदेवांनी संगितलेले काही प्रमुख मुद्दे:

"मृदूतेमध्येच खरी शक्ती आहे. कठोरता हा दुर्बळांचा स्थायीभाव असतो."

"दृष्यमान असा एकच बदल आहे. तो म्हणजे वागणुकीतील व चारित्र्यातील सुधारणा"

"जसजसे काम कमी होत जाते, तसतशी जबाबदारी वाढत जाते"

**तामिळ नूतन वर्ष: दि. १४ एप्रिल २०१४**

सकाळी लवकर उठून गुरुदेवांनी काही अभ्यासींना अभिवादन केले. ध्यानगृहामध्ये सत्संग संचालित करण्याची त्यांची इच्छा होती परंतु अचानक थकवा जाणवू लागल्यामुळे त्यांनी तो बेत रहित केला. त्या दिवशी त्यांना जास्त लोकांच्या भेटी घेता आल्या नाहीत.



## विशू, केरळी नववर्षः दि. १५ एप्रिल, २०१४



केरळमधील जवळजवळ ८० आणि चेन्नई येथील काही मल्याळी अभ्यासी 'विशू' हा सण साजरा करण्यासाठी कुटिराच्या प्रांगणात जमले होते. तेथे गुरुदेवांचे आगमन झाले. 'विशू' या दिवशी सर्वप्रथम पहावयाची गोष्ट, फळे, भाज्या, फुले, एक धातूचा आरसा आणि नाणी या शुभ वस्तूंचा समावेश असलेली 'विशुक्कानी' मांडण्यास गुरुदेवांनी परवानगी दिली. अभ्यासी बंधू कृष्णा यांनी मल्याळी भाषेत केलेल्या भाषणानंतर गुरुदेवांनी एक सिटींग दिले. विशुक्कानीच्या वस्तूंमधील आरसा पाहून, 'आरसा पाहिल्यावर आपल्याला आपल्या आतमधील गुरुदेव दिसले पाहिजेत' अशी त्यांनी टिप्पणी केली. नंतर गुरुदेवांनी तेथे जमलेल्या सर्व अभ्यासी बंधू आणि भगिनींना 'विशू कैनित्तम' दिले (पारंपारिकरित्या जे कुटुंबातील ज्येष्ठांकडून कुटुंबातील सर्वांना दिले जाते.)

## रविवार, २० एप्रिल २०१४

गुरुदेवांनी ध्यानगृहामध्ये सत्संग संचालित केला. सकाळी ७.१० वा. त्यांचे ध्यानगृहामध्ये आगमन झाले आणि सत्संग सुरु होईपर्यंत, १० मिनिटांपेक्षा जास्त वेळ त्यांनी संयमाने वाट पाहिली. सत्संग झाल्यानंतर गुरुदेवांनी तीन विवाह संपन्न केले. सत्संगानंतर जेव्हा सूचना देण्यात येत होत्या, तेव्हा 'गुरुदेव ध्यानगृहातून बाहेर जाईपर्यंत जागेवरुन उठू नये' ही सूचना देण्याचे राहून गेले. म्हणून गुरुदेवांनी बंधू प्रकाश यांना बोलावले आणि ते निवेदन करण्यास सांगितले. कुटिरात परत गेल्यावर गुरुदेवांनी काही वेळ गीतेवरील सत्र ऐकले आणि मग ते विश्रांती घेण्यास गेले.

## गल्फ कार्यशाळा– दि.२५–३० मार्च २०१४

मध्य–पूर्वेकडील देशांमधील जवळजवळ ४०० अभ्यासी आणि १०० लहान मुले या कार्यशाळेत सहभागी झाली होती. दि. २५ रोजी बंधू कमलेश यांनी स.९ वाजता सत्संग संचालित केला आणि साधनेचे महत्व सांगणाऱ्या एका उत्कृष्ट भाषणाने कार्यशाळेचे उद्घाटन केले. सर्व दिवशी सकाळच्या कार्यक्रमात भाषणांचा समावेश होता आणि सायंकाळी विविध विषयांवरील सादरीकरणे होती. दि. २९ रोजी समारोपाच्या सत्रात बंधू कमलेश यांनी पद्धतशीर साधनेची गरज यावर सहभागींना संबोधित केले. त्यांनी 'इग्रेगोर', एक सामूहिक कंपन, ज्यामुळे अधिक जागृत अशी मानवजात निर्माण होऊ शकते आणि जगामध्ये चांगला बदल घडवून आणता येतो, याचा अर्थ स्पष्ट करून सांगितला. दि. ३० रोजी डॉक्टरांच्या सल्ल्याविरुद्ध आणि ताप व अशक्तपणा असतानाही गुरुदेव सत्संग झाल्यानंतर सर्व अभ्यासींना भेटले.



## युरोपियन प्रशिक्षकांची कार्यशाळा, मणपक्कम, दि.१५–२० फेब्रुवारी २०१४

युरोपच्या जवळजवळ सर्व देशांमधून सुमारे ३०० अभ्यासी या कार्यशाळेस उपस्थित राहिले. ह्या कार्यशाळेने सहभागींना जणू मनन–शील अशा आंतरिक पातळीवर नेले. यावेळी गुरुदेव अभिजाततेविषयी बोलले– निर्मितीच्या आणि सर्जनशीलतेच्या सर्व क्षेत्रातील जाणकारांना अनुभव घेणे कसे गरजेचे आहे आणि आवश्यक असलेल्या तारतम्याची अचूक आणि उत्तम पातळी गाठण्यासाठी आपल्या कामावर प्रेम करण्याची कशी गरज आहे याबद्दल गुरुदेवांनी सांगितले. निष्काळजीपणे केलेले काम आणि प्रेमाने आणि समर्पणपूर्वक केलेली एखादी गोष्ट यातला फरक त्यांनी दर्शविला.

बंधू कमलेश यांनी दिलेल्या इतर भाषणांत त्यांनी लालाजी महाराजांच्या, ज्यांनी स्वतःपेक्षा इतरांवर अधिक प्रेम केले, अभिवृत्तीची आठवण करून दिली. तसेच बाबूजी महाराजांकडे सर्वात शुद्ध पातळीवरील जाणीव आणि संवेदनशीलता होती हेही त्यांनी सांगितले. प्रशिक्षकांनीदेखिल आपण अजुनही आपल्या धार्मिक पार्श्वभूमीने कसे ग्रस्त असू शकतो या शक्यतेचा विचार करुन लहान गटांमध्ये काम केले.

एखाद्या जुन्या चित्राचा जीर्णोद्धार जसा कुशलतेने, हळुवारपणे आणि काळजीपूर्वक केला जातो तशाच प्रकारे गुरुदेवांनी आपल्याला प्रेरणा दिली आहे असे सर्वांना जाणवले. एखाद्या हरलेल्या व नाऊमेद झालेल्या माणसाला त्याच्या मूळ दैवी स्थितीमध्ये परत आणणे ही गौरवशाली शक्यता सहजमार्गाने आपल्याला दिलेली आहे.

मानव हा खरा मानव तेव्हा असतो जेव्हा त्याची नजर त्याच्या आंतरिक 'स्व' वर खिळलेली असते. तेथेच सत्याचा खरा शोध दडलेला असतो. जो यास चिकटून रहातो तो त्या क्षेत्रामध्ये आपला पाया पक्का करतो जेथून सर्वकाही निर्माण होते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर तो मूळ स्त्रोताबरोबर आपली नाळ जोडतो. यानंतर फक्त एकच गोष्ट उरते आणि ती म्हणजे विस्तार, ज्यासाठी निर्धारित साधना पुरेशी ठरते.

*बाबूजी महाराज*

*कंप्लिट वर्क्स ऑफ रामचंद्र, खंड २, पृष्ठ ५९.*

## सहज मार्गाचा प्रसार

**अहमदाबाद, गुजरात**



दि. ७ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता जॉगर्स पार्क येथे ‘भारतीय योग संस्थान’ या एका अभ्यासीद्वारा चालविण्यात येणाऱ्या संस्थेतर्फे योग वर्गास येणाऱ्यांसाठी ‘निरोगी जीवनासाठी आनंदी रहा’ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

डॉ. विनोद अगरवाल व बंधू भद्रेश यांनी ‘ध्यानाचे महत्व’, ‘मानवी जीवनातील गुरुची भूमिका’ व ‘सहजमार्गाची ठळक वैशिष्ट्ये’ यांवर भाष्य केले. नव्वद पैकी सुमारे चाळीस सहभागींनी सहजमार्गाबद्दल कुतूहल दर्शविले. अनेकांनी प्रश्न विचारले त्यांचे प्रशिक्षकांनी निरसन केले.

**ताडीपत्री, अनंतपुर जिल्हा, आंध्र प्रदेश**

मार्च महिन्यामध्ये कडापा व ताडीपत्री येथील विविध महाविद्यालयांमध्ये आयोजित केलेल्या खुल्या सत्रांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. सुमारे २७५ विद्यार्थ्यांनी रस दर्शवला व त्यामधील १७० जणांनी साधनेची सुरुवात केली. यापैकी १२० जण ताडीपत्री अभियांत्रिकी महाविद्यालयातील होते. आंध्रप्रदेशाच्या विविध भागातील सुमारे वीस प्रशिक्षक विद्यार्थ्यांना सिटींग देण्यास एकत्र आले होते. प्रशिक्षकांना व ही सत्रे आयोजित केलेल्या स्वयंसेवकांना यातील काही मुमुक्षुंची तयारी जाणवली. यातून



गुरुदेवांचे कार्य प्रगट होत होते. ताडीपत्री मधील एका महाविद्यालयाच्या व्यवस्थापक मंडळाने त्यांच्या आवारात प्रारंभिक सिटींगची व्यवस्था केली तसेच नेहमीच्या बुधवारच्या सत्संगासाठी एक खोली उपलब्ध करुन दिली. १८ वर्षांखालील अनेक विद्यार्थी जे साधनेची सुरुवात करु इच्छित होते ते वयाच्या मर्यादेमुळे नाराज झाले.

**कडापा**

कडापा मधील दंत महाविद्यालय, अभियांत्रिकी व पदव्युत्तर महाविद्यालय तसेच स्थानिक बँक व योग केंद्र येथे पाच खुली सत्रे आयोजित करण्यात आली. त्यातील काही सत्रांना विशेषत: महाविद्यालयातील सत्रांना, इतका उत्तम प्रतिसाद मिळाला की जवळजवळ पन्नास विद्यार्थी थोड्याच कालावधीत सहजमार्गाची साधना सुरु करणार आहेत. कडापा जिल्ह्यातील पुलिवेंदला आश्रमातही एका खुल्या सत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यास सुद्धा उत्तम प्रतिसाद मिळाला. वेंपल्ले, पुलिवेंदला, कडापा, ताडीपत्री, हैद्राबाद येथील प्रशिक्षक व आरटीटीपी कादिरीतील काही अभ्यासींनी सिटींग्स साठी मदत केली.

**कोरुटला व मेटपल्ली केंद्रे, उत्तर आंध्र प्रदेश**

आंध्रप्रदेशातील उत्तर विभागाच्या दौऱ्यादरम्यान बंधू मधु कोथापल्ली (विभाग प्रमुख) आणि त्यांच्या चमुने जगित्यालच्या स्थानिक प्रशिक्षकांच्या मदतीने जगित्यालच्या ५ कि. मी. सभोवतालच्या परिसरात कोरुटला व मेटपल्ली येथे दोन नवीन केंद्रे सुरु केली. परतीच्या प्रवासात ते चहापानासाठी थांबले व गुरुदेवांच्या कृपेने नवीन केंद्रांचा नीट जम बसू दे अशी प्रार्थना त्यांनी केली.

एका महिन्याच्या आतच बंधू मनचला कृष्णा यांनी या नवीन केंद्रांमधे खुली सत्रे आयोजित केली. बंधू कृष्ण राव यांनी कोरुटला येथे सहजमार्गाची ओळख करुन दिली. वीस लोकांनी प्रारंभिक सिटींग्स घेतल्या. मेटपल्ली येथे बंधू सिंगमाराजु यांनी दहा नवीन अभ्यासींचे स्वागत करताना साधना पध्दती विषयी भाषण केले. याच उत्साहाने









जगित्याल, करीमनगर, कोथागुदेम व सिद्दीपेठ येथे आणखी खुली सत्रे आयोजित करण्यात आली. सुमारे १०० नवीन अभ्यासींनी प्रारंभिक सिटींग्स घेतल्या. नेहमी प्रमाणेच मनापासून केलेली प्रार्थना फळास आली.

**पालक्कड, केरळ**

पालक्कड आश्रमापासुन सुमारे २५ कि.मी. अंतरावर असलेल्या वदवन्नूर येथील नायर सर्व्हीस सोसायटीत भगिनी श्यामला मेनन यांनी एका खुल्या सत्राचे आयोजन केले होते. काही अभ्यासींसह एकूण तेवीस जण या कार्यक्रमास हजर होते. बंधू कृष्णन के.टी. (केंद्रप्रमुख) 'धर्म व आध्यात्मिकता' यावर बोलले आणि त्यांनी मानव जीवनातील आध्यात्मिकतेचे महत्व विशद केले. बंधू मुरलीधरन एम. यांनी 'मनुष्य जीवनाचा उद्देश' या विषयावर भाषण केले व लक्ष्य साध्य करण्यामधील आध्यात्मिकतेची भूमिका समजावून सांगितली. यानंतर प्रश्नोत्तराचे एक सत्र झाले.

**खरगपूर, पश्चिम बंगाल**

दि. ८ मार्च रोजी खरगपूर जवळील रुपनारायणपुर येथील टाटा हिताची प्लॅंट मधील सुमारे पंचाहत्तर कर्मचाऱ्यांसाठी दोन तासांचा ध्यानाविषयी जागृती करणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भगिनी चंदर–कांता अरोरा व बंधू सी.एस.आर. मूर्ती, बी.बी. बेरा व इतर स्वयंसेवकांनी संचालित केलेल्या या कार्यक्रमाच्या समन्वयक भगिनी श्रीलता होत्या. वक्त्यांनी संतुलित जीवनाची आवश्यकता व महत्व अधोरिखित केले आणि ते साध्य करण्यास आध्यात्मिकतेची कशी मदत होते हे विषद केले. त्यांनी सहज मार्ग पद्धतीची थोडक्यात माहिती दिली. शांत अशा आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी सर्वांना खरगपूर केंद्रात येण्याचे आमंत्रण देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

**म्हैसूर, कर्नाटक**

फेब्रुवारी महिन्यामध्ये बंधु ए.पी.दुराई (सह सचिव) यांनी म्हैसूर मधील कर्नाटक पोलीस अॅकॅडमीस भेट दिली. या भेटीदरम्यान दि. १६ व १७ फेब्रुवारी रोजी दोन खुली सत्रे आयोजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण १२० प्रशिक्षणार्थी उप निरीक्षक सहभागी झाले होते, त्यापैकी तेहेतीस प्रशिक्षणार्थींनी साधनेस सुरुवात केली. सर्व प्रशिक्षणार्थी व काही कर्मचारी एप्रिल अखेरीस सुरुवात करतील. प्रशिक्षणार्थी पुढील आठ महिने अॅकॅडमीतच राहणार असल्यामुळे त्याच आवारात नियमीत रविवारचा सत्संग व वैयक्तिक सिटींग आयोजित करण्यात येणार आहेत. त्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांची नियुक्ती कर्नाटक मधील विविध भागांत होईल. म्हैसूर विभागातील आठ प्रशिक्षकांनी या कार्यक्रमात भाग घेतला.

**तामिळनाडू**

दि.१६ ते २१ मार्च दरम्यान तामिळनाडू मधील तंजावर, तुथुकुडी व तिरुनेलवेली जिल्ह्यातील दौऱ्यात बंधु ए.पी.दुराई (सह सचिव) यांनी विविध केंद्रांना भेटी देऊन अभ्यासींसोबत बातचीत केली आणि खुल्या सत्रांचे संचालन केले.

तंजावर येथून १५ किमी अंतरावर असलेल्या सरकारी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांच्या क्लबमध्ये प्रशिक्षक बंधू सुब्रमण्यम व मुरुगारसन यांनी एक सत्र आयोजित केले होते, यामध्ये तीस कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय सहभागी झाले होते. पाच जणांनी ताबडतोब साधनेला सुरुवात केली. तंजावर येथील VETRI IAS स्टडी सर्कल मधील सुमारे ऐंशी विद्यार्थांना सहजमार्गाविषयी सादरीकरण करण्यात आले.

कॉलेज ऑफ एज्युकेशन, तोतुकूडी येथे १२० प्रशिक्षणार्थी शिक्षक सहभागी झाले होते. स्पिकनगर जवळील मुथैयापुरम येथे वीस महिलांनी भाषण ऐकले व पाच जणांना प्राथमिक सिटींग देण्यात आली.

श्रीवैकुंटम येथील खुल्या सत्राचे ठिकाण होते केजीएस कॉलेज ऑफ आर्ट्स आणि वडकांगुलम येथे अरुल कॉलेज ऑफ इंजिनियरींग व राजाज कॉलेज ऑफ एज्युकेशनचे विद्यार्थी हजर होते.

तिरुचेंदूर व उडनगुडी यांच्या मधे असलेल्या कांचनविलाई मधील सर्व्हाईट कॉन्व्हेंट आणि स्कूलला भेट देण्यात आली, तिथे भगिनी अॅक्विलीना (प्रशिक्षक) यांनी जीझसच्या शिकवणीपासून ते सहजमार्ग साधनेपर्यंतचे स्थित्यंतर यावर एक भाषण आयोजित केले होते. त्यांच्या पाच भगिनी नन्सनी प्रारंभिक सिटींग घेतल्या.

उडनगुडी उपकेंद्रामधे बंधु मुथुकृष्णा यांच्या घरी खुले सत्र झाल्यावार पाच व्यक्तींनी साधनेची सुरुवात केली. वडकांगुलम येथे आश्रमातील खुल्या सत्रास दहा पाहुणे हजर होते. विभाग प्रमुख, बंधू रामनाथन व स्थानिक प्रशिक्षक, भगिनी मीरा शंकर व बंधू रामदास, नल्लाइराम, कृष्णराजन हे या उपक्रमात सहभागी होते.



## राजमुंद्री, आंध्रप्रदेश





दि. १४ एप्रिल रोजी तटीय आंध्र प्रदेश विभागामधील श्रीकाकुलम, विजयनगरम, विशाखापटनम आणि पूर्व व पश्चिम गोदावरी जिल्ह्यातून २२ प्रशिक्षक राजमुंद्री येथील नूतन आश्रमात जमले होते. विभागप्रमुख बंधू एम. आदिनारायण यांच्या मार्गदर्शनाखाली 'सिटींग कसे द्यावे' या विषयावरील गुरुदेवांच्या व्हिडीयोने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर सत्संग झाला. गुरुदेवांची सेवा करीत असताना प्रशिक्षकांनी अधिक उत्तम प्रशिक्षक व अधिक क्रियाशील कार्यकर्ते झाले पाहिजे असे विभागप्रमुखांनी सांगितले. त्यांनी मिशनच्या उपक्रमांमध्ये लहान मुले व युवकांना आकर्षित, प्रोत्साहित व सहभागी करणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेखा प्रस्तुत केली. काही प्रशिक्षकांनी, प्रशिक्षक म्हणून अधिक चांगले काम कसे करता येईल यासंबंधी उपयुक्त सूचना केल्या तसेच लहान मुलांसाठी यशस्वीपणे राबविण्यात आलेल्या काही कार्यक्रमांबद्दल माहितीही दिली. प्रशिक्षकांनी एकमेकांना वैयक्तिक सिटींग्ज दिल्या व त्यांच्या नोंदी एकमेकांना उपलब्ध करून देण्यात आल्या. मिशनच्या 'गोपनीय प्रतिका'शी (Esoteric Symbol) संबंधित व्हिस्पर्समधील संदेशांच्या संचाचे वाचन व सखोल चिंतनासाठी वितरण करण्यात आले. बैठक अत्यंत प्रभावी व उपयुक्त ठरली आणि बैठकीचा समारोप सत्संगाने करण्यात आला.

## जसवंतगड, जिल्हा नागौर, राजस्थान

दि. ६ एप्रिल रोजी जसवंतगड, लाडनुन, दिडवाना, सुरजगड या केन्द्रांतून तसेच आजूबाजूच्या खेड्यातून जवळपास ९० अभ्यासी आसावा येथील विश्रामगृहात जमले होते. विभागप्रमुख बंधू विकास व जोधपूरमधील बंधू अनिल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न झाला. सत्संगानंतर न्याहारीपूर्वी गुरुदेवांचा एक व्हिडीयो दाखविण्यात आला. मग एका भजनानंतर 'सत्योदय' या ऑडियो पुस्तकामधील मधील एक अध्याय ऐकविण्यात आला. तदनंतर अभ्यासींची चार गटांत विभागणी करण्यात आली आणि नुकत्याच ऐकविण्यात आलेल्या ऑडियोवर त्यांना प्रश्न विचारण्यात आले. पुढील प्रश्नमालिका 'सहजमार्गाची मूलतत्वे' या विषयावर होती. या चर्चाफेरीदरम्यान बऱ्याच अभ्यासींनी त्यांना वैयक्तिकरित्या अनुभवास आलेल्या शंकांचे निरसन करून घेतले.

## अहमदाबाद, गुजरात

कृषि पार्श्वभूमी असलेल्या अभ्यासी बंधू-भगिनींच्या एका गटाने अहमदाबाद येथील अडालज आश्रमाच्या परसातील बागेमध्ये स्वयंसेवक म्हणून काम करण्याचे ठरवले. अभ्यासींना शुद्ध, ताज्या व कीटनाशकविरहित सेंद्रीय भाज्यांचा वाजवी दरात पुरवठा करावा या हेतूने या उपक्रमाचा आरंभ करण्यात आला. रविवारी व इतर प्रसंगी आश्रमातील भोजनासाठीही या भाज्यांचा उपयोग केला जातो. या स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली लहान मुलांनादेखील भाज्या वाढविण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. स्वयंसेवकांच्या कठोर परिश्रमांमुळे आश्रमात सुयोग्य प्रकारे निगा राखलेली एक परस-बाग उभी राहिली आहे.

## वरणगाव, महाराष्ट्र

दि. ६ एप्रिल रोजी वरणगाव, भुसावळ, खिर्डी, दीपनगर, जळगाव आणि धुळे येथील पंचावन्न अभ्यासी अर्ध्या दिवसाच्या कार्यक्रमास उपस्थित होते. 'सहजमार्गाची दहा सूक्ते' व 'चारित्र्य निर्मिती' या विषयांवर परस्परचर्चात्मक व प्रबोधनात्मक असे सत्र संचालित करण्यात आले. त्यानंतर 'एक दुर्मिळ संधी' ही डीव्हीडी दाखविण्यात आली.

एका खुल्या सत्राचे तसेच लहान मुलांसाठीही एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर सहजमार्ग साधना आणि नियमित साधनेद्वारा सोप्या व प्रभावी पद्धतीने विचारांचे नियमन करून त्यांना सकारात्मक दिशा देण्यात सहजमार्ग साधना बजावत असलेली भूमिका या विषयावर एक अनौपचारीक भाषण झाले.





## सुरत, गुजरात येथे व्हि.बी.एस.सी.





दि. १२ एप्रिल रोजी सुरत केंद्राने व्हि.बी.एस.सी. चा परिचय करून देण्याच्या उद्देशाने रॅडियंट इंग्लिश ॲकॅडेमी, उमरा, पिप्लोड येथे 'शिक्षणामध्ये मूल्यांची आवश्यकता' या विषयावर पालकांसाठी दिशानिर्देशन कार्यक्रम आयोजित केला होता. १२० पालक, शाळेचे मुख्याध्यापक, विश्वस्त व शिक्षक कर्मचारी या सत्रात सहभागी झाले होते. एस.एच.पी.टी.ने तयार केलेल्या नवीन अभ्यासक्रमाची ओळख इयत्ता ९वी च्या विद्यार्थ्यांना जून २०१४ ते मार्च २०१५ या शैक्षणिक वर्षामध्ये करून दिली जाणार आहे. या प्रसंगी पालकांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहपूर्ण होता. मुलांच्या भविष्यात पालकांचा वाटा मोलाचा असल्यामुळे पालकांकरीतासुद्धा असा कार्यक्रम आयोजित करण्यात यावा अशी विनंती काही पालकांनी केली.

## यु– कनेक्ट, जयपूर, राजस्थान

जयपूर येथील आर्च पॉइंट कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेड येथे यु–कनेक्ट विषयीचा पहिला दिशानिर्देशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. शिक्षक व दहा सहभागींनी परस्परांची ओळख करून घे–ऊन कार्यक्रमाला प्रारंभ केला. पुढील सोळा सत्रांमध्ये गटाने पाळावयाचे नियम तयार करण्यासाठी डॉ. आशिष जोहरी या वक्त्याने सहभागींना निमंत्रित केले. यानंतर वक्त्याने एका रानबदकाची गोष्ट सांगितली, ती ऐकून सहभागी, आयुष्यामध्ये योग्य गोष्ट, योग्य वेळी करण्याच्या आवश्यकतेवर विचार करण्यास प्रवृत्त झाले. उपस्थित सहभागींमध्ये आध्यात्मिक विकासाला चालना मिळावी या हेतूने त्यांना काही प्रश्न विचारण्यात आले. जीवनामध्ये आध्यात्मिक मार्ग अनुसरण्याची आवश्यकता त्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी बंधू आशिष यांनी उदाहरणे व प्रश्नांचा उपयोग केला. हे एक परस्पर–संवादी सत्र होते. यामध्ये सहभागी झालेल्यांच्या चेहेऱ्यावर आनंद झळकत होता.

## स्वयंसेवकांसाठी सत्र, मुंबई

दि. १९ फेब्रुवारी रोजी भगिनी शुभदा नायक यांच्या उदयगिरी या निवासस्थानी सुमारे चाळीस अभ्यासी जमले होते. अवतरणे, रंजक गोष्टी व स्वानुभवाचे बोल यांचा वापर करत 'मिशनमध्ये स्वयंसेवी कार्य' या विषयावर बंधू मोहनदास हेगडे यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपण गुरुदेवांचे वाहक बनले पाहिजे व सेवेद्वारा प्रेम वृद्धिंगत केले पाहिजे असे त्यांनी सुचविले. याची सुरूवात करण्यासाठी समित्यांची निर्मिती व त्यांचा परस्पर समन्वय हे एक उत्तम व्यासपीठ ठरू शकेल असेही त्यांनी सांगितले. एका स्वयंसेवकाने प्रत्येक गटाशी संपर्क साधून, पुढील महिन्याच्या कालावधीत तीन प्रश्न विचारावेत असे ते म्हणाले: मी उत्तम अभ्यासी कसा बनू शकेन? अधिक चांगली सेवा करण्यासाठी मी काय करावयास हवे? आणि मी याचा प्रारंभ केला आहे का?

## श्रीनगर

गट केंद्र, सी.आर.पी.एफ. कॅम्प, बदामी बाग येथे 'ध्यान' व 'शुद्धिकरण'या विषयांवरील जी.आय.टी.पी. कार्यक्रम करण्याकरीता जम्मू केंद्राचा एक चमू श्रीनगर येथे गेला होता. कर्फ्यू व बंद ह्या नेहमीच्याच घटना असणारे श्रीनगर हे एक अशांत शहर आहे. तेथे अशा प्रकारचा हा पहिलाच कार्यक्रम होता.

सुमारे पस्तीस अभ्यासी याकरीता उपस्थित होते. त्यापैकी बहुतेक जण भारतभरातून आलेले सी.आर.पी.एफ.चे कर्मचारी होते. विभाग ११–ए चे प्रमुख बंधू सुरेंदर शर्मा यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. प्रशिक्षक बंधू जुगल किशोर व अश्वनि ठाकूर यांनी जी.आय.टी.पी. कार्यक्रमाचे संचालन केले.





## युवा सत्रे



### भिलवाडा, राजस्थान

फेब्रुवारीच्या शेवटच्या रविवारी, सकाळच्या सत्संगानंतर एका खास सत्रात सुमारे बारा युवा अभ्यासी सहभागी झाले होते. लालाजी महाराजांच्या जन्मदिवस समारंभाच्या वेळेस बंधू कमलेश पटेल यांनी ‘दैनंदिन जीवनातील आपले आचरण कसे सुधारावे?’ या विषयावर भाषण केले होते. एका अभ्यासी भगिनीने त्यांच्या भाषणातील काही अवतरणे उद्धृत केली. त्यानंतर साधना सुरू केल्यापासून आपल्या आचरणात झालेल्या बदलांविषयीची निरीक्षणे अभ्यासींनी परस्परांना सांगितली. ज्यांना साधनेमध्ये समस्या जाणवत होत्या, त्यांना ‘सहजमार्गाची मूलतत्वे’ हे पुस्तक वाचण्याचा आणि वैयक्तिक सिटिंगसाठी प्रशिक्षकांकडे जातील तेव्हा समस्यांविषयी चर्चा करण्याचा सल्ला देण्यात आला.

दि. ३० मार्च रोजी युवकांची अजून एक बैठक घेण्यात आली. नव्या अभ्यासींना ‘भंडारा’ या संकल्पनेची ओळख करून देण्यात आली. जे अभ्यासी यापूर्वी भंडाऱ्यास उपस्थित राहिले होते त्यांनी आपले अनुभव सांगितले. स्थानिक पातळीवर बाबूजी महाराजांच्या जन्मदिवस सोहोळ्याची तयारीसुद्धा चालू झाली होती. त्या अनुषंगाने करावयाच्या कामाच्या प्राथमिक नियोजनावर चर्चा झाली. विविध स्वयंसेवी कामांसाठी अभ्यासींनी नोंदणी केली.

### वाराणसी, उत्तर प्रदेश

दि १२ ते१४ एप्रिल दरम्यान वाराणसी केंद्रात आठ प्रशिक्षक, पाच समन्वयक, दहा स्वयंसेवक आणि बारा युवा अभ्यासी यांचा अंतर्भाव असणारा एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. प्रथम सर्वांना वैयक्तिक सिटिंग देण्यात आली. नंतर प्रेम आणि शिस्त, आज्ञापालन, सेवा, गुरुदेवांचा स्वीकार, सहजमार्गाची दहा सूक्ते आणि युवकांची सहजमार्गातील भूमिका यावरिल भाषणे झाली. त्याचबरोबरच ‘अध्यात्मिकता कशासाठी?’ यावरील आणि विविध संस्था आणि एल.एम.ओ.आय.एस., क्रेस्ट, एस.एम.एस.एफ, एस.एच.पी.टी सारखे ट्रस्ट आणि रिट्रिट केन्द्रे यांवर सादरीकरणे झाली.

सहभागींना सहजमार्गावरील पुस्तके देण्यात आली आणि दिले गेलेले विषय सादर करण्यास सांगण्यात आले. त्यांनी ‘जगण्याची कला’, ‘सातत्यानेच अचूकपणा येतो’, ‘घरापासून प्रेमाची सुरुवात होते’ आणि ‘सहनशीलतेचे फळ हे नेहमी मधुर असते’ या विषयांवर छोटी नाटके सादर केली गेली. दोन तास स्वयंसेवी कामासाठी देण्यात आले होते. कार्यक्रमात गुरुदेवांची भाषणे, गोल्डन सायलेंस (मौन–काळ), आणि सांघिक सत्संग यांचाही समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी अभ्यासींनी सत्रांविषयी आपल्या अनुभवांची देवाण–घेवाण केली.

### विभागप्रमुखांची मुरादाबाद, उ.प्र.ला भेट

दि. १३ एप्रिल रोजी विभागप्रमुख बंधू अशोक गर्ग यांनी मुरादाबाद आश्रमास भेट दिली. सत्संग झाल्यानंतर बोलताना त्यांनी भंडाऱ्यास उपस्थित रहाण्याची आवश्यकता व साधनेचे महत्व यावर प्रामुख्याने भर दिला. नंतर त्यांनी प्रशिक्षकांची सभा घेतली आणि केंद्राचा विकास करण्याच्या भविष्यातील योजनेबद्दल चर्चा केली. विभागप्रमुखांनी त्यानंतर आश्रमाच्या व्यवस्थापन समितीच्या सभांमध्येही सहभाग घेतला, सर्व शंकांचे निरसन केले, चौकशीला उत्तरे दिली, आणि आश्रम सुस्थितीत ठेवण्यासाठी काही क्लुप्त्या सांगितल्या.

### विभागप्रमुख, द. तमिळनाडू यांची मनमदुराई भेट

दि. २३ फेब्रुवारीला मनमदुराई येथे शिवगंगई, करैकुडी, परमकुंडी आणि रामनाथपुरम केंद्रामधून सुमारे १३० अभ्यासींसाठी एक पूर्ण दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सत्संग आणि न्याहारीनंतर अभ्यासींना सात गटात विभागण्यात आले. प्रत्येक गटास ध्यान, शुद्धिकरण, प्रार्थना, सेवा, गुरुदेवांविषयी प्रेम, व्यक्तिमत्वाची जडण–घडण इ. सहजमार्ग साधनेची अंगे असलेले विषय देण्यात आले. चर्चेनंतर प्रत्येक गटाच्या एका अभ्यासीने आपल्या गटाचे विचार प्रस्तुत केले.

बंधू रामनाथन म्हणाले की प्रत्येक अभ्यासीने सहजमार्गाची मूलतत्वे चांगल्या रितीने समजावून घेतली पाहिजेत आणि गुरुदेवांच्या म्हणण्यानुसार स्वत:चे आयुष्य साध्या आणि नैसर्गिक पद्धतीने व्यतीत केले पाहिजे.

बाबूजी महाराजांच्या जन्मदिवस समारंभात २०१३ मध्ये प्रथमच काही मुलांचे कार्यक्रम करण्यात आले होते. लहान मुलांनी त्यावर आधारित एक नाटक आणि काही रंजक कार्यक्रमही सादर केले.

दुपारच्या जेवणानंतर झालेल्या एक तासाच्या प्रश्नोत्तरच्या कार्यक्रमाने अभ्यासींच्या मनातील सहजमार्गाची समज दृढ झाली. कार्यक्रमाची सांगता सायंकाळच्या सत्संगाने झाली.





## रायचूर, कर्नाटक

रायचूर, गुलबर्गा, शोरापूर, गोगी व इतर काही केंद्रांतून आलेल्या शंभर अभ्यासींसाठी बंगळुरू येथून आलेल्या बंधू वेंकट राव व त्यांच्या चमूने दि. ५ व ६ एप्रिल रोजी 'मिशनचे साहित्य वाचण्याचे महत्व' या विषयावर दोन दिवसांचा कार्यक्रम रायचूर आश्रमात संचालित केला. दोनही दिवशी कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७.३० वाजताच्या सत्संगाने झाली. भाषणे, प्रश्नोत्तरांची सत्रे, परस्परचर्चा व विचारविमर्ष, प्रश्नमंजुषा व इतर काही उपक्रमांच्या सत्रांचा या कार्यक्रमात समावेश होता. दोनही दिवसांचा शेवट सत्संगाने करण्यात आला. बंधू डॉक्टर गजेन्द्र सिंग, (विभाग प्रमुख, उत्तर कर्नाटक) संपूर्ण कार्यक्रमास उपस्थित होते व त्यांनी वेळोवेळी मौल्यवान सूचना करून आपले योगदान दिले. कार्यक्रमाचा आपल्याला लाभ झाल्याची भावना सर्वच अभ्यासींच्या हृदयात होती व प्रत्येकाने त्याविषयी समाधान व्यक्त केले. जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात गुलबर्गा आश्रमात अशाच प्रकारच्या आणखी एका कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.



## खरगपूर, पश्चिम बंगाल

दि. ९ मार्च रोजी खरगपूर केंद्रात पस्तीस नव्या अभ्यासींसाठी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भौतिक संपत्ती संपादन करण्यापेक्षा आपले ध्येय प्राप्त करण्यासाठी प्राधान्य देण्याच्या आवश्यकतेवर भर देणारे गुरुदेवांचे भाषण असलेला एक व्हिडियो दाखविण्यात आला. साधनेविषयी असलेल्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. काही अभ्यासींना ते आपली दैनंदिन साधना कशा प्रकारे करतात याविषयी वर्णन करण्याची विनंती करण्यात आली. त्यातून असे निदर्शनास आले की बरेच अभ्यासी विहित निर्देशांप्रमाणे साधना करीत नाहीत. साधनेच्या अचूक पद्धतीविषयी त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. 'प्रॅक्टीस ऑफ सहजमार्ग' या पुस्तकातील ध्यान, शुद्धीकरण व प्रार्थना हे विषय इंग्रजी व बंगाली या भाषांतून वाचून दाखविण्यात आले तसेच त्यांचा हिंदी अनुवाद करून सांगण्यात आला. भगिनी चंदरकांता यांनी ध्यान, शुद्धीकरण, प्रार्थना, सत्संग आणि भंडारा या विषयांवरील सादरीकरण हिंदीतून प्रस्तुत केले. अल्पोपाहार व चहापानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नविन नियुक्त्या

**केन्द्रप्रमुख, गोवा**

**बंधू दत्तप्रसाद विनायक भोंसले**


## नवी प्रकाशने




टुवर्ड्स इन्फिनिटी
तामिळ



सहजमार्ग काय आहे
मराठी





वे कहते हैं भाग ५
हिंदी


माझे गुरुदेव
ऑडियो पुस्तक– तेलगू



सत्योदय
ऑडियो पुस्तक – बंगाली


अनंतकी ओर
ऑडियो – हिंदी



सहजमार्ग मीएंडरिंग्स
तामिळ, तेलगू, हिंदी, मराठी, गुजराथी, कन्नड व मल्याळम



सत्योदय
ऑडियो पुस्तक – मल्याळम



दि पॉईंट ऑफ अटेंशन
इंग्रजी – डीव्हीडी



इंडिया इन द वेस्ट
इंग्रजी – डीव्हीडी



इन ट्यून विथ नेचर
इंग्रजी– डीव्हीडी

# केरळ क्षेत्रीय आश्रम, आलुवा

## प्रकाशाचे केंद्र



""माझे काहीही नाही' असे निसर्गाचा प्रथम व अंतिम नियम सांगतो. परंतु जर मी दिव्यतेचा वाहक झालो, तर मी चिरंजीव होऊन जाईन. कारण, दिव्यतेला एका अजरामर अशा वाहकाची गरज असते, ज्यामधून ती नेहमीच प्रवाहित होऊ शकेल."

पी. राजगोपालाचारी, दि. ६ सप्टेंबर १९९५, आलुवा.



आलुवा येथील सर्वात पहिले सत्संगाचे ठिकाण बंधू मधुसूदनन यांच्या घरी होते. अभ्यासींची संख्या वाढल्यानंतर त्यांच्या घराच्या पहिल्या मजल्यावर एका ध्यानकक्षाचे बांधकाम करण्यात आले. त्याचे उद्घाटन संस्थेचे तत्कालीन सचिव बंधू सरनाडजी यांच्या हस्ते दि. २० मे १९९४ रोजी झाले.

गुरुदेवांची केरळला पहिली औपचारिक भेट दि. ६ सप्टेंबर १९९५ रोजी होती. आलुवा महानगरपालिकेच्या महात्मा गांधी नगरभवनात एका भव्य समारंभाचे आयोजन केले होते, त्यामध्ये सुमारे ८०० अभ्यासी सहभागी झाले होते.

दि. १२ जानेवारी १९९६ रोजी गुरुदेवांनी जवळच्याच एका कडुंगलूर नावाच्या गावामध्ये जमीन विकत घेण्याची परवानगी दिली. एका सखल विभागातील २ एकर जागा विकत घेऊन, त्यामध्ये लाल मुरुमाची भर घालून त्यासभोवती कुंपणसाठी भिंत व फाटक बांधले गेले. या जागेचे 'सहजग्रामम' असे नामकरण करण्यात आले. त्यातील ७० टक्के एवढी जागा आश्रमासाठी सोडून उर्वरीत जागेमध्ये ५ टक्के एवढ्या आकाराचे प्लॉट्स तयार केले गेले. २८ अभ्यासींकडून मूळ किंमत जमा झाली व आता त्या परिसरात १० परिवार राहत आहेत.

गुरुदेवांनी त्यांच्या दुसऱ्या भेटीमध्ये दि. २५ फेब्रुवारी २००१ रोजी आश्रमाचे उद्घाटन केले. त्यावेळी एक ५००० चौ. फूटाचा ध्यानकक्ष, पहिल्या मजल्यावरील तीनही बाजूंना ३ निवासकक्ष व दुसऱ्या मजल्यावरील छतावर असणाऱ्या २ मोठ्या पाण्याच्या टाक्या एवढीच सोय होती. गुरुदेवांनी अभ्यासींकडून काही प्लॉट्स आश्रमासाठी विकत घेण्याचे सुचविले व अशाप्रकारे सध्या मिशनकडे १.१४ एकर एवढी जागा आहे.

आश्रमाचे नूतनीकरण २०११ मध्ये केले गेले. भरपूर पाऊस व हवेतील आर्द्रता लक्षात घेऊन, पारंपारिक केरळच्या वास्तुकलेनुसार आश्रमाच्या दर्शनी भागात मोठा बदल केला गेला. लोखंडी जोडकाम तसेच रंगीत अल्युमिनियम व मिश्रधातूने बनविलेल्या छताचाही यात समावेश होता. या कामाची पूर्तता २०१२ च्या सुरुवातीला झाली. या नूतनीकृत आश्रमाचा व्हिडीयो घेऊन मणपक्कम येथे गुरुदेवांना दाखविण्यात आला तेव्हा गुरुदेवांनी "अत्त्युत्तम" असा शेरा दिला.

विकेंद्रित उत्सव, क्षेत्रीय स्तरावरील बैठका, प्रशिक्षण शिबीरे व प्रशिक्षकांच्या बैठका हे कार्यक्रम या आश्रमामध्ये केले जातात. हा आश्रम क्षेत्रीय लेखाविभागासाठी मध्यवर्ती केंद्र व सर्व SHPT आणि SRCM प्रकाशनाच्या वितरणाचे मध्यवर्ती वितरण केंद्र देखील आहे. संस्थेच्या केरळमधील सर्व केन्द्रीय घडामोडी आलुवाच्या आश्रमामधूनच हाताळल्या जातात.







To download or subscribe to this newsletter, please visit http://www.sahajmarg.org/newsletter/india For feedback, suggestions and news articles please send email to in.newsletter@srcm.org

© 2014 Shri Ram Chandra Mission ("SRCM"). All rights reserved. "Shri Ram Chandra Mission", "Sahaj Marg", "SRCM", "Constant Remembrance" and the Mission's Emblem are registered Trademarks of Shri Ram Chandra Mission.This Newsletter is intended exclusively for the members of SRCM. The views expressed in the various articles are provided by various volunteers and are not necessarily those of SRCM.